## ‘अजूनही काम करणार, करत राहणार...’ – अरुणा सबाने



**अरुणा सबाने** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.

नमस्कार,

मला महाराष्ट्र फाउंडेशनचा समाजकार्य प्रबोधन पुरस्कार मिळाला आहे. त्याबद्दल मी महाराष्ट्र फाउंडेशनच्या सर्व मंडळींना धन्यवाद देते. अनेक जण मला विचारतात की, हा समाजप्रबोधन पुरस्कार तुम्हाला ज्या कार्याबद्दल मिळाला आहे, त्या कार्यामागची तुमची प्रेरणा कोणती? याचं उत्तर असं आहे की, मला सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मिळावी असा एखादा विशिष्ट प्रसंग माझ्या आयुष्यात घडला आहे असं नाही. खरं म्हणजे समाजकार्याचं बाळकडू मला जन्मत:च मिळालं. मी ज्या कुटुंबात जन्माला आले,त्या कुटुंबात माझे वडील, माझा भाऊ हे दोघंही सामाजिक कार्यातच कार्यरत होते. वडील गांधीवादी होते. त्यांनी शेती भूदान यज्ञात दिली होती. तेव्हापासून मी हे सगळं बघत होते, ऐकत होते. आणि ते पाहत पाहतच मी मोठी झाले. मी शिक्षणासाठी जेव्हा नागपूरमध्ये आले, तेव्हा मला सर्वप्रथम भेटले ते म.य. दळवी आणि नेताजी राजगडकर. त्यांच्या संपर्कात आल्यानंतर माझ्यावर आणखी वेगळे, चांगले संस्कार होत गेले. लहानपणीच्या संस्कारांना एक विशिष्ट दिशा मिळाली. नागपूरमध्ये मी त्यानंतर

सतत चळवळीमध्ये राहिले. मग ती हुंडाविरोधी चळवळ असो, बलात्कारविरोधी चळवळ असो, चळवळीतले अनेक मोर्चे असोत, मी त्यांत असायचेच. 'मथुरा प्रकरण' हे भारतातलं पहिलं बलात्काराचं गाजलेलं प्रकरण. त्याच्या निषेधार्थ नागपूरमध्ये जो भव्य मोर्चा निघाला होता, त्यात सामील होणारी मी अगदी लहान वयाची, केवळ सतरा-अठरा वर्षांची मुलगी होते.

हुंडाविरोधी चळवळीमध्ये ज्या काही केवळ आठ-नऊ तरुणी होत्या, त्यांत मी एक होते. त्यामुळे हे सर्व करता करता सामाजिक कार्यासंदर्भातलं एक सुयोग्य वळण माझ्या आयुष्याला लागत गेलं आणि मी सतत चळवळीतच राहिले. चळवळच माझ्यामध्ये राहिली असं म्हटलं तरी चालेल. आणि भावी आयुष्यात तर या चळवळीनेच मला जगवलं, असं म्हटलं तरी हरकत नाही. पुढे मी बरंच काही काम करत गेले. लिहीत गेले. आणि त्यानंतरच्या माझ्या आयुष्यात एक टर्निंग पॉइंट आला. त्यानंतर काही दिवस माझ्यासमोर अंधार होता – अचानक आलेला. माझं आयुष्य स्थलांतरितच म्हटलं पाहिजे. आणि त्यातून मी जेव्हा सावरले, माझे पोटापाण्याचे प्रश्न जेव्हा मिटले, त्यानंतर मी सर्वप्रथम 'माहेर' नावाची एक संस्था स्थापन केली. त्यामागचा उद्देश असा होता की, अडचणीतल्या स्त्रियांना मदत करायची, मुख्यत्वे परित्यक्त महिलांना. आणि नंतर तर मग फक्त स्त्रियाच नाहीत तर, अडलेला कुठलाही घटक असो, त्याला मदत करायची, असं माझं धोरण राहिलं.. आपण या सर्वांना मदत करू शकतो ही जाणीव मला झाली आणि मला आत्मविश्वास आला.

त्याच दरम्यान मला वर्तमानपत्रात एक कॉलम चालवायला मिळाला. त्यातून मी खूप लिहिती झाले. ते लिहिलेलं वाचल्यानंतर अनेकांना, विशेषत: अडलेल्या महिलांना असं वाटायला लागलं की, या मॅडम छान मार्गदर्शन करू शकतात. आणि मग माझ्याकडे खूप केसेस यायला लागल्या. अनेकदा



मला अतिशय वाईट वाटायचं की, अंगावरची हळद पण सुकलेली नसायची, हातांवरची मेंदी पण निघालेली नसायची, अशा मुलींना त्यांचे पालक माझ्याकडे घेऊन यायचे. अशा नवोदित वधूंपासून, ते चक्क साठ वर्षांच्या महिलांपर्यंत संसाराचा उबग आलेल्या, छळल्या गेलेल्या, अत्यंत त्रासलेल्या अशा स्त्रिया माझ्याकडे येऊ लागल्या. त्यांत एका डीवायएसपीच्या पत्नीचं प्रकरण मला फार भयंकर वाटलं होतं. अशा अनेक केसेस मला सांगता येतील. एक तर आई आणि तिच्या तीन मुली असं चौघींचंही शोषण होणारं एक कुटुंब होतं. अशा अनेक केसेस माझ्याकडे येत गेल्या. आणि मी हिरिरीने त्या सगळ्या केसेस हाताळण्याचा, त्यांना न्याय मिळवून देण्याचा, प्रसंगी पोलीस स्टेशनला जाण्याचा किंवा त्या स्त्रियांना पोलिसांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करू लागले. कारण आपल्याकडे सामाजिक प्रतिष्ठेचा खूप मोठा बागुलबुवा बसलेला असतो आपल्यावर. त्यामुळे अनेकींना पोलिसांशिवाय मदत हवी असायची. अशाही स्त्रियांना मला माझ्या आयुष्यात मदत करता आली.

आणि हे सारं करता करता वळणं मिळत मिळत अश्वमेध यज्ञाला आम्ही विरोध केला.तो यज्ञही माझ्या आयुष्याची एक मजबूत बाजू मला पुढे न्यायला कारणीभूत ठरला. अशा अनेक गोष्टी सामाजिक कार्य करत असताना माझ्यासोबत घडत गेल्या.आणि एक वेळ अशी आली की, या कामांसोबतच मी जलसंवर्धन या विषयाकडे वळले. कारण मुळात मी एक शेतकऱ्याची, पाटलाची मुलगी होते. लहानपणापासून पाणी हा विषय किती महत्त्वाचा आहे हे मला माहिती होतं. आणि लोक पाण्याचा किती नासोडा करतात याची मला जाणीव होती. पाणी आहे म्हणून काय नासोडा करायचा? ‘नासोडा’ हा माझ्या आईचा शब्द. तो माझ्या खूप लक्षात राहिला होता. आणि मी पण पहायचे की, शहरी माणूस किती भरमसाठ पाणी खर्च करतो. तर मग मी या विषयाकडेही वळले. मी एक ‘अखिल भारतीय जलसाहित्य संमेलन’ आयोजित केलं. त्या माझ्या कामाची विशेषत्वाने नोंद घेतली गेली. जपानला ‘थर्ड इंटरनॅशनल वर्ल्ड वॉटर कॉन्फरन्स’ घेतली गेली. त्यामध्ये सहभागी होण्याकरता त्यांनी मला बोलावलं. आणि ही ‘जलसाहित्य’ची संकल्पना माझ्या मनात नेमकी काय आहे, त्याविषयी मला काय म्हणायचं आहे, हे व्यासपीठावरून सांगण्याची मला संधी दिली.

अशा अनेक गोष्टी मी करत गेले, करते आहे. आजही मला अनेक गोष्टी करायच्या आहेत. माझ्या या कामाची नोंद महाराष्ट्र फाउंडेशनने घेतली, त्याचा मला खूप आनंद होतो आहे. आणि एक महत्त्वाचं म्हणजे या पुरस्काराने मला आणखी काम करायचं बळ मिळालं आहे. लोक मला म्हणायचे, ‘आता तुम्ही साठी ओलांडली, काय काम करता?’ पण या पुरस्कारामुळे मला आणखी काम करायला बळ मिळालं आहे, त्यामुळे मी आणखी काम करत राहणार आहे.

हा पुरस्कार दिल्याबद्दल मी पुनश्च एकदा आपल्या सर्वांचे आभार मानते, विशेषतः सुनील देशमुख आणि त्यांच्या सहकार्यांचे, आणि थांबते.

*arunasabane123@gmail.com/9970095562*